RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784

वर्ष ३ रे | अंक : १९६ वा शुक्रवार दि १९ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

जिल्हा सामान्य रुग्णालयाची शस्त्रक्रिया करणार कोण?

अनेक वर्षापासून वीजतंत्री खुर्चीला चिकटले! पात्रता नाही..मात्र लोकप्रतिनिधींचे अभय?

जनसंचलन/बुलढाणा

पाठपुरावा भाग ००१

कोव्हिडं १९ काळापासून नेहमी चर्चेत असलेले बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात करोडो रुपयांचा विविध विभातील भ्रष्टाचाराची खोलवर जाऊन काढलेली माहिती व त्याचा पाठपुरावा काही दोषींची उचलबांगडी तसेच निलंबनपासून बडतर्फ होईपर्यंत बातमीपत्र आरोग्य शासनपत्रव्यवहार बोगस कंत्राटदार जीएसटी न भरता व मॅनेजकरून मिळवलेली करोडो रुपयांची कामे न करता तत्कालीन जिल्हाशल्य चिकित्सक यांनी पूर्ण बिले अदा केली व पुन्हा त्याच नालायक कंत्राटदारांना दुसऱ्याच्या नावे पुन्हा कामे दिली.याची पोलखोल पुढील प्रत्येक सत्रात पहा

भ्रष्टाचाराचे माहेरघर म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालयाची ओळख दूरपर्यंत झाली आहे.अनेक वर्षापासून एक वीजतंत्री खुर्चीला चिकटलेले असून, त्यांना लोकप्रतिनिधीचे अभय असल्याचे म्हटले जात आहे. पात्रता नसताना, ते मलिदा खाऊन भ्रष्टाचार करीत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात वीजतंत्री असूनही अति महत्त्वाच्या जबाबदार विभागात व जिल्ह्यातील सर्व विभागातील अत्यंत महत्त्वाचे बिल व मलाईवाली फाईल असा टेबल शिक्षण पात्रता नसलेल्या वीजतंत्री यांच्याकडे कित्येक वर्षांपासून वरिष्ठ आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या मर्जीत व संगणमताने देण्यात आला आहे. या पदासाठी राजकीय व आर्थिक वजनाचा दबाव टाकून मलिदा खात असल्याची खळबळ जनक माहिती समोर आली आहे. नुकतेच नियुक्त झालेले कर्तव्यदक्ष जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बिराजदार यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयातील शिक्षण पात्रता नसलेल्या त्या अधिकारी किंवा कर्मचारी तसेच वर्षोनुवर्षे एकाच ठिकाणी ठाणं मांडून बसलेल्या डेपोटेशनच्या नावाखाली वेगवेगळ्या विभागातील त्या अधिकाऱ्यांची ? त्वरित बदली करावी व त्यांना

शासनाकडून मिळत असलेला दरमहा पगार व त्यांची आजची मालमत्तेची त्वरित चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी कारवाई करून त्यांना बडतर्फ करा अशी मागणी जिल्ह्याभरातून जोर धरीत आहे.

लाडक्या बहिणींनो, ही प्रक्रिया तात्काळ करा, अन्यथा पैसे बंद होणार; सरकारने उचललं मोठं पाऊल

वृत्तसंस्था/मुंबई

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा अनेक अपात्र महिला; तसेच काही पुरुषांनीही लाभ घेतल्याची प्रकरण उघडकीस आल्यापासून राज्य सरकार पुन्हा कामाला लागलं आहे. आता लाभार्थी बहिणींची पडताळणी करण्यासाठी ई-केवायसीच्या माध्यमातून आधार कार्डची पडताळणी करण्यात येणार आहे. महिला व बालविकास विभागाने या संदर्भातील आदेश गुरुवारी जारी केले आहेत. पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण चालू आर्थिक वर्षात १८ सप्टेंबरपासून दोन महिन्यांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आलं असून, असं प्रमाणीकरण न करणाऱ्यांवर पुढील कार्यवाही करण्याचा इशारा विभागाने दिला आहे. या योजनेचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांपैकी २६ लाख लाभार्थी निकषानुसार पात्र नसल्याचं आढळून आलं आहे. या योजनेचा राज्यातील अनेक सरकारी कर्मचारी-अधिकारी; तसेच त्यांच्या कुटुंबीयांनीही लाभ घेतल्याचे उघड झाले होते. त्यामुळे सरकार आता ॲक्शन मोडवर आले असून दोन महिन्यांनंतर आणखी काही लाडक्या बहिणींना या योजनेतून वगळले जाण्याची शक्यता आहे. लाडक्या बहिणींच्या जोरावर राज्यात महायुतीने सत्ता स्थापन केली. त्यानंतर त्यांचा विसर पडला. हफ्ते देणे बंद केले. अनेकांना योजनेतून बाद केले. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्याने पुन्हा एकदा लाडक्या बहिणींसाठी हफ्त्यांची जुळवाजुळव केली जात आहे. पण, विधानसभा निवडणुकीपूर्वी ज्यांना लाभ मिळाला, त्यानंतर त्यांना अपात्र ठरवले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर उरलेल्यांनाही बाहेरचा रस्ता दाखवला जाणार आहे, असा गंभीर आरोप नुकताच काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्याकडून करण्यात आला आहे. विधानसभेच्या निवडणुकीत लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली. महायुतीला मोठ्या प्रमाणात बहुमत मिळाले, त्यानंतर मात्र लाडक्या बहिणींसाठी आर्थिक तरतूद करताना सरकारला तारेवरील कसरत करावी लागत असल्याचे दिसून येते. सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विभागाचा निधी लाडक्या बहिणींसाठी वळवल्याने मोठा वादही निर्माण झाला होता. त्यानंतर लाडक्या बहिणींची संख्येत कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला. पडताळणी करताना काही सरकारी कर्मचारी असलेल्या बहिणींनीसुद्धा याचा लाभ घेतल्याचे

आढळून आले. सुरुवातीला सरकारी बहिणींना स्वतःहून लाभ सोडण्याचे आवाहन करण्यात आले होते. आता कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. त्यानंतर केंद्र व राज्य यापैकी एकाच योजनेचा लाभ घेता येईल, असे फर्मान काढण्यात आले. दोन्ही योजनांचा लाभ घेणाऱ्या बहिणींना आता लाडक्या बहिणीतून वगळलं जात असल्याचं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

लोकशाही, लोकशाही, दार उघड!

संपादकीय लेख

सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट शब्दांतील आदेशांनाही केराची टोपली दाखवून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याबाबत चालढकल करणारे राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोग यांना न्यायालयाने कडक शब्दांत फटकारले आहे. येत्या ३१ जानेवारीपूर्वी कोणत्याही परिस्थितीत या निवडणुका घेण्याचा निर्वाणीचा इशारा न्या. सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने दिला; त्यामुळे या मुदतीत निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्यावाचून पर्याय राहिलेला नाही. चार महिन्यांत या निवडणुका घेण्याचा आदेश न्यायालयाने मे महिन्यातच दिला होता; परंतु सरकार आणि निवडणूक आयोग निवांत राहिले. त्यानंतर बुधवारी झालेल्या सुनावणीतही राज्य सरकारने निवडणुका न घेण्याबाबत अडचणी मांडल्या, तेव्हा खंडपीठाने ङ्न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणुका घेण्याच्या मुद्द्यावर निष्क्रियता आणि विलंब, हे अक्षमतेचे निदर्शक आहे,फ अशा शब्दांत सरकारची कानउघाडणी केली. वर्षभर अभ्यासाकडे ढुंकूनही न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेपूर्वीच्या आठवड्यात अभ्यासाची धांदल उडते, तद्वतच आता केवळ चार महिन्यांतच राज्यातील २९ महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा, २८९ पंचायत समित्या आणि २५७ नगरपालिकांच्या निवडणुकांची प्रक्रिया पार पाडण्याची वेळ राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगावर आली आहे. करोनाच्या काळात राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आणि त्यांवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली. पुढे विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये इतर मागासवर्ग गटातील (ओबीसी) आरक्षणाच्या मुद्द्यावरून; तसेच मुंबईतील प्रभागसंख्येवरून न्यायालयीन लढाई सुरू झाली. त्यात काही वर्षांचा कालापव्यय झाल्यानंतर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा अजूनही अनिर्णित असून, न्यायालयाने त्या आरक्षणास सशर्त मान्यता देऊन निवडणूक घेण्याचा आदेश दिला. मात्र, सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाने वेगाने पावले उचलली नाहीत. या संस्थांमधील प्रभागरचनेचे प्रारूप तयार असून त्यावरील हरकतींवर सुनावणीची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, प्रत्यक्ष निवडणुका झाल्या नाहीत. त्या पार्श्वभूमीवर झालेल्या ताज्या सुनावणीत राज्य सरकार आणि आयोगाने पुन्हा थांब माझ्या बाळाला तीट लावू दे,फच्या सुरात निरनिराळ्या सबबींचा पाढा वाचला. इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रांच्या उपलब्धतेबाबतही प्रतिज्ञापत्र सादर करण्याची सूचना केली. प्रभागरचनेचे काम ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करा, असा आदेश देऊन, ङ्नपूर्वीपासून हे मुद्दे ठाऊक असतानाही जाणीवपूर्वक विलंब केला,फ असेही न्यायालयाने सरकारला सुनावले. या परिस्थितीला जबाबदार कोणीही असले, तरी हा सारा घटनाक्रम लोकशाहीला वाकुल्या दाखवणाराच ठरला आहे. त्यामागे प्रथमदर्शनी करोना आणि न्यायालयीन तिढा, ही कारणे दिसत असली, तरी राजकीय सोयीचा मुद्दाही त्यामागे आहे. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर लोकप्रतिनिधी नसल्याने सर्वसामान्य नागरिकांची कमालीची गैरसोय होत असली, तरी राज्यातील सत्ताधाऱ्यांची मात्र सोयच झाल्याचे दिसते. त्यामुळे या ना त्या कारणाने निवडणुका लांबणीवर टाकल्या गेल्या. यामुळे सर्व शहरांत नोकरशाहीचे राज्य निर्माण झाले आहे. लोकप्रतिनिधींअभावी प्रशासक, म्हणजे मनपा आयुक्त प्रशासनाच्या वतीने प्रस्ताव सादर करतात, स्थायी समितीच्या नात्याने तेच मान्यता देतात आणि सर्वसाधारण सभेचेही अधिकार असल्याने ते स्वत:च मंजूरही करतात, असे लोकशाहीचे विडंबन संपूर्ण राज्यभर सुरू आहे. सोबतच संबंधित खात्यांचे मंत्री, जिल्ह्यांचे पालकमंत्री, शहरातील प्रभावी नेते व नोकरशाही यांच्यातील हातमिळवणीतून प्रकल्पांची मान्यता, निधीची तरतूद असे सत्तेचे अभूतपूर्व केंद्रीकरण झाले आहे. त्यात नागरिकांच्या प्राधान्याला शेवटचे स्थान मिळत आहे. दुसरीकडे दैनंदिन समस्या सोडविणारे लोकप्रतिनिधी नसल्याने त्या सोडविण्यासाठी सर्वसामान्य नागरिक वेगवेगळ्या कार्यालयांचे उंबरे झिजवत आहेत आणि फक्त आपल्या ङ्नआकांफ्ना उत्तरदायी असलेली नोकरशाही इतरांना दाद लागू देत नाही. राजकीय नेतृत्वाची नवी पिढी स्थानिक निवडणुकांतून घडते; परंतु निवडणुकांअभावी त्यालाही खीळ बसली आहे. करोनासाथीच्या अपवादात्मक काळात हे ठीक होते; पण आता हाच पायंडा सुरू राहणे लोकशाहीसाठी घातक आहे. त्यामुळे संबंधितांनी तातडीने पावले उचलून या मुदतीत निवडणुका घ्याव्यात आणि न्यायालयाकडून होणारा संभाव्य मुखभंग टाळावा

देऊळघाट येथील कार्तिक अंकुश बोराडे याची आर्चरी या क्रीडा प्रकारात जिल्हास्तरावर विजयी होऊन विभागीय स्तरावर निवड...

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक पी.एम.श्री. जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय देऊळघाट येथील विद्यार्थी कार्तिक अंकुश बोराडे याचा तालुका क्रीडा संकुल धाड नाका बुलढाणा येथे झालेल्या जिल्हास्तरीय आर्चरी क्रीडा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक आला असून त्याची विभाग स्तरावर निवड झालेली आहे.

आज संस्थेचे प्राचार्य व सर्व शिक्षक, शिक्षिका यांच्यातर्फे वर्ग ९ वी चा कार्तिक बोराडे याने ग्रामीण भागातील विद्यार्थी असताना सुद्धा आर्चरी या क्रीडा प्रकारांमध्ये दैदीप्यमान यश संपादन केल्या प्रित्यर्थ त्याचे आणि त्याचे वडील अंकुश बोराडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सत्काराच्या वेळी आदरणीय प्राचार्य आर.आर.सय्यद सर यांनी इतर मुलांनी सुद्धा कार्तिक बोराडे या विद्यार्थ्यासारखे विविध क्रीडा प्रकारांमध्ये तसेच इतर प्रकारांमध्ये स्वतःला सिद्ध करावे यासाठी आवाहन केले आणि प्रेरणापर मार्गदर्शन केले. कोणताही विद्यार्थी आपल्या मेहनतीच्या आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे व प्रबळ इच्छाशक्ती च्या जोरावर कोणत्याही क्रीडा प्रकारामध्ये उत्तुंग यश प्राप्त करू शकतो यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. आर्चरी क्रीडा प्रकार हा भारतातील सर्वात जुना क्रीडा प्रकार असुन यामध्ये भारताचा जागतिक

स्तरावर दबदबा असल्याचे प्राचार्य यांनी प्रतिपादन केले. जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय देऊळघाट येथील अनेक विद्यार्थी येथील क्रीडा शिक्षक आणि क्रीडाविषयक मार्गदर्शन करणारे शिक्षक वृंद यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी विविध क्रीडा प्रकारात राज्यस्तरापर्यंत जात असतात. त्यामुळे प्राचार्य आर आर सय्यद आणि शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्तिकला पुढे राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरापर्यंत जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्याचा व त्याच्या वडिलांचा उत्साह वाढवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील क्रीडा शिक्षक श्री एस एल राजपूत यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री हमीद खान सर यांनी केले.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

काय सांगता! सैराटमध्ये झळकलेले रिंकू राजगुरूचे खरे आई-वडील? या सीनमध्ये दिसलेली झलक

मुंबई: एखादा सिनेमा रिलीज झाल्यानंतर आठवडा भर तरी थिएटरमध्ये राहू दे...अशी प्रार्थना निर्माते करत असतात. काही सिनेमे पहिल्याच आठवड्यात बॉक्स ऑफिसवरून गायब होतात. पण काही असे चित्रपट जे गेल्या अनेक वर्षांपासून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत आहेत. असाच एक सिनेमा म्हणजे सैराट.सैराट सिनेमानं मराठी सिनेइंडस्ट्रीत एक वेगळंच चैतन्य निर्माण केलं असं म्हणावं लागेल. या सिनेमाची दखल बॉलिवूडनंही घेतली. बॉक्स ऑफिसवर तब्बल १०० कोटींहून अधिक कमाई या सिनेमानं केली होती. आजही या सिनेमाचा रेकॉर्ड कोणत्याही सिनेमाला मोडता आला नाहीये.रिलीजनंतर आजही सैराट सिनेमातल्या कलाकारांची तितकीच क्रेझ पाहायला मिळतेय. रिंकू राजगुरू, आकाश ठोसर यांना मिळालेलं स्टारडम त्यांनी जपलंय. तर अनेक कलाकारांचं आयुष्य या सिनेमामुळं बदलल्याचं दिसून आलं.सैराटचं यश नेमकं कशात होतं? याला अनेक उत्तरं आहेत. पण एक यश म्हणजे या सिनेमात दिसलेले चेहरे. कोणताही ग्लॅमरस चेहरा नाही. सिनेमाच्या स्क्रिनवर दिसणारं प्रत्येक पात्र हे आपल्यापैकीच एक असल्याचं प्रेक्षकांना वाटणं, हेच याचं यश होतं.दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी या सिनेमात मातीतले कलाकार घेतले. आपल्या आजुबाजूच्या मंडळींना, काही नातेवाईकांना त्यांनी या सिनेमात दाखवलं.

इतकंच नाही तर अभिनेत्री रिंकू राजगुरू हिची आई देखील या सिनेमात झळकली होती.होय,सैराट सिनेमात रिंकूसोबत तिची आई देखील झळकली होती. तुम्ही अनेकदा हा सिनेमा पाहिला असेल तरी,ही गोष्ट तुमच्या लक्षात आली नसेल.तर आर्ची आणि परशाला पोलिस पकडून पोलिस स्टेशनमध्ये आणतात. तेव्हा आर्चीचे वडिल पोलिस स्टेशनमध्ये येतात. तिचे वडील परशावर विनयभंगाची खोटी केस दाखल करतात हे समजल्यावर आर्ची पोलिस स्टेशनमध्ये आरडाओरड करत संताप व्यक्त करते. तेव्हा एका सीनमध्ये पोलिस स्टेशनच्या बाहेर रिंकूची आई उभी असलेली पाहायला मिळते. तर या सीनमध्ये खिडकीच्या बाहेरही तिच्या आईची झलक पाहायला मिळते.

ठरलं तर मग! कोण होतीस तू काय झालीस तूमालिकेतील अभिनेत्री लवकरच चढणार बोहल्यावर, म्हणाली...

मुंबई - सध्या स्टार प्रवाह वाहिनीवरील प्रत्येक मालिकेत नव-नवीन ट्विस्ट पाहायला मिळत आहेत. त्यातलीच एक मालिका म्हणजे कोण होतीस तू काय झालीस तू ही मालिका. या मालिकेच्या कथेला वेगळं वळण आल्यामुळे ही मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरतेय. आता कोण होतीस तू काय झालीस तू या मालिकेमध्ये यश-अमृता आणि कावेरी-उदय यांचं लग्न होणार आहे. त्यामुळे या मालिकेत लग्नाची जोरदार तयारी सुरू आहे. मालिकेमध्ये लग्न तर होतच आहे. पण त्याचबरोबर या मालिकेतील अभिनेत्रीसुद्धा लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. याबद्दल स्वतः या अभिनेत्रीनं सांगितलं आहे. या अभिनेत्रीच्या लग्नाची तयारीही सुरू झाली आहे. राजश्री मराठी शोबझला दिलेल्या मुलाखतीदरम्यान साक्षी गांधी आणि साक्षी महाजन यांना त्यांच्या खऱ्या आयुष्यातील लग्नाबद्दल विचारण्यात आलं. त्यावर साक्षी महाजनने कबुली डेट ती पुढच्या वर्षी लग्न करणार असल्याचं सांगितलं आहे. साक्षी म्हणाली की, हो मी पुढच्या वर्षीच लग्न करणार आहे. त्यामुळे खूप काय काय डोक्यात आहे. कोणती स्टाइल करायची? कोणतं फाउंडेशन

लावायचं? कुठल्या रंगाची साडी? वगैरे वगैरे चर्चा सुरू झाल्या आहेत. सगळं सुरू आहे. डोक्यात भरपूर काही. लवकरच तुम्हाला सगळ्यांना कळेलसाक्षी महाजनच्या लग्नाबद्दल सांगताना साक्षी गांधी म्हणाली की, लग्नाचा विषय निघाला की, ती खूपच उत्सुक होते.

तिचं म्हणणं आहे की, माझं लग्न एकदाच होणार आहे ना! बाकी सगळ्या गोष्टी मी दहावेळा करेन. पण लग्न एकदाच होणार आहे ना! तिच्याकडून मला काही नवीन शब्द कळले आहेत. जसे की, वेडिंग फाउंडेशन, वेडिंग लिपस्टिक, वेडिंग व्हॅनिटी असं बरंच काही सुरू आहे. पुढे साक्षी महाजन म्हणाली की, मालिकेत आता जे हे काही लग्नाचे कार्यक्रम सुरू आहेत, त्यावरून सुकन्या मोने ताई, मंदार जाधव असे सगळेच जण चिडवत आहेत. सगळं छान सुरू आहे. माझ्या लग्नात साक्षी गांधी ही माझी करवली असणार आहे. तिला मी आधीच सांगितलं आहे की माझी चिडचिड होऊ नये, यासाठी ती आजूबाजूलाच हवी.दरम्यान, कोण होतीस तू काय झालीस तू या मालिकेमध्ये साक्षी गांधीने यमुनाची भूमिका साकारली आहे तर साक्षी महाजनने विद्याची भूमिका साकारली आहे. मालिकेमध्ये यमुना आणि विद्या एकमेकींच्या विरोधात असतात. मात्र, खऱ्या आयुष्यात त्या एकमेकींच्या खूप चांगल्या मैत्रिणी असून एकमेकींसोबतचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करतात.

मराठी अभिनेत्रीचा दोन वेळा झालेला भीषण अपघात, ट्रकखाली गेलेली कार; म्हणाली, माझा पुनर्जन्म...

मुंबई - मानसी नाईक ही मराठी कलाविश्वातील सुप्रसिद्ध अभिनेत्री असून तिला वाट बघतोय रिक्षावाला या गाण्यानं प्रचंड लोकप्रियता मिळाली. मानसी तिच्या प्रोफेशनल आयुष्यासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळेही कायम चर्चेत असते. मानसीचा काही वर्षांपूर्वी भीषण अपघात झालेला. पण, याबद्दल तिनं

तेव्हा काहीच सांगितलं नव्हतं. पण नंतर एका मुलाखतीदरम्यान, मानसीने या अपघाताबद्दल सांगितलं आहे. अभिनेत्रीचा दोन वेळा अपघात झालेला. त्यातून ती थोडक्यात बचावल्याचं तिनं सांगितलं आहे.मानसी म्हणाली की, खरंतर पुनर्जन्म झालाय. मी तर म्हणेन पुन्हा पुनर्जन्म झालाय. आधी एक अपघात झालेला, त्यानंतर पुन्हा माझा ॲक्सीडेन्ट झाला आणि त्यावेळी माझी संपूर्ण टीम होती. एक्स्प्रेस हायवेवरून येताना अपघात झालेला आणि पहिला अपघात परळीवरून येताना झालेला. दुसऱ्या अपघातात माझी संपूर्ण टीम माझ्यासोबत होती. त्या अपघातामध्ये माझ्या डोळ्याला लागलं होतं. स्वामींची कृपा मी डोळे बंद करुन गाडीत बसले होते त्यामुळे मी वाचले. रात्रीचा प्रवास करू नये, हे पहिलं आणि दुसरी गोष्ट म्हणजे रात्रीची ड्रायव्हरला झोप लागते. मी इनोव्हा मधून प्रवास करत होते. पुढे माझा बॉडीगार्ड बसला होता. तर त्याचं डोकं फाटलं. ड्रायव्हरला झोप लागली, त्याला काही झालं नाही पण गाडी एका ट्रक खाली घालवली. इनोव्हाची नॅनो झाली. हे असंच पहिल्या अपघातादरम्यान झालेलं. माझ्यासोबत असलेल्या मुलीलासुद्धा मार लागला. असं मानसीनं पुढे सांगितलंदेवावरच्या श्रद्धेबद्दल सांगताना मानसी म्हणाली की, मी गणपती बाप्पा, तुळजाभवानी आणि स्वामी समर्थ यांना मी खूप मानते. ह्यांच्यामुळे मी खरंतर जगासमोर वावरतेय. गाडीची झालेली अवस्था बघून मला असं वाटलं, देव आपल्याला खूप चान्सेस देतोय. दरम्यान, मानसीच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं तर तिनं, ढोलकी, जबरदस्त, पहिली भेट यांसारख्या सिनेमांमध्ये काम केलं आहे.

अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांसाठी सरकारकडून मोठी मदत, परभणीला तब्बल १२८ कोटींचा निधी मंजूर

परभणी : मागील चार महिन्यांपासून परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत आहे. त्यामुळे खरिपाच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नदी, नाल्यांना पूर आल्यामुळे नदीपात्रा लगतच्या जमिनीचे देखील प्रचंड नुकसान झाले. त्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी, अशी मागणी करण्यात येत होती. त्याच अनुषंगाने आज राज्य सरकारने शासन निर्णय काढून अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी तब्बल १२८ कोटी ५५ लाख रुपयांच निधी मंजूर केला आहे. हे अनुदान शेतकऱ्यांच्या थेट खात्यामध्ये हस्तांतरित करण्याबाबतचा आदेश देखील याच शासन निर्णयात देण्यात आलेला आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना चांगलीच मदत होणार आहे. राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाबद्दल परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.परभणी जिल्ह्यामध्ये यावर्षीच्या मान्सूनमध्ये जून पासूनच मोठ्या प्रमाणावर पाऊस पडू लागला होता. जून, जुलै, ऑगस्ट या तीन महिन्यांमध्ये तब्बल ५७० मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती. त्यानंतर सप्टेंबर महिन्यामध्ये आत्तापर्यंत जवळपास १३७ मिलिमीटर पाऊस पडला आहे. परभणी जिल्ह्यात आत्तापर्यंत तब्बल ६८८ मिलिमीटर पाऊस झाला आहे. आणि तो वार्षिक सरासरीच्या तब्बल १०२% एवढा आहे.अद्यापही पावसाळा आणखीन शिल्लकच आहे. पाऊस केवळ मोठ्या प्रमाणावरच पडला नाही तर काही भागात सतत पाऊस पडला. तर काही भागात ढगफुटी सदृश्य पाऊस पडला. ज्यामुळे शेती पिकाचे प्रचंड नुकसान झाले. ओढ्या, नाल्याला, नदीला पूर आला आणि त्या पुराच्या पाण्यामुळे देखील शेतीचे अतोनात नुकसान झाले. आणि शेतकऱ्यांचे खरिपाचे हाताशी आलेले पीक वाया गेले.मधील दोन महिन्यापासून परभणी जिल्ह्यात नुकसान झालेल्या शेती पिकांचे पंचनामे चालू होते. या आधारावरच राज्य सरकारकडे शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी, अशी मागणी विभागीय आयुक्तांकडून सरकारकडे करण्यात आली होती. आज राज्य सरकारने परभणी जिल्ह्यासाठी तब्बल १२८ कोटी ५५ लाख रुपयाचा निधी मंजूर केला आहे.परभणी जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी आणि पूर यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून हा निधी मंजूर करण्यात आला आहे. सदरील निधीचे वितरण हे सरकारने सुचित केल्यानुसार डीबीटी पोर्टलद्वारे लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात वितरित करण्यात येणार आहे. एका हंगामात एक वेळेस याप्रमाणेच विहित दराने ही मदत देण्यात येणार आहे. कोणत्याही लाभार्थ्याला मदत देताना द्विवृत्ती होणार नाही याची तहसील आणि जिल्हाधिकारी कार्यालयाने कटाक्षाने काळजी घेण्यासंदर्भात देखील सूचना देण्यात आले आहेत. ज्या प्रयोजनासाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करावा, असे देखील या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.ज्या ज्या वेळी शेतकऱ्यांवर संकट येते त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहतात. यावर्षी देखील खरीप हंगामामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडला आणि शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले. शेतकऱ्याच्या हाता तोंडाशी आलेले खरिपाचे पीक वाया गेले. त्यामुळे शेतकरी प्रचंड हवालदिल झाला होता. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परभणी जिल्ह्यासाठी तब्बल १२८ कोटी रुपयांचा निधी देऊन परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सुखद धक्का दिला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पालकमंत्री या नात्याने आभार मानतेङ्ङ्ग, असं पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी एका व्हिडिओद्वारे सोशल मीडियावर सांगितले आहे.

गोपीचंद पडळकर यांची जीभ घसरली, जयंत पाटील यांच्या वडिलांचा उल्लेख करुन अतिशय खालच्या शब्दांत टीका

मुंबई : भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांच्यावर अतिशय खालच्या शब्दांत टीका केला आहे. त्यांनी जयंत पाटील यांचा एकेरी उल्लेख केलाच आहे. त्यासोबत त्यांनी जयंत पाटील यांच्या वडिलांचा उल्लेख करत पातळी सोडून टीका केली आहे. गोपीचंद पडळकर यांच्या याबाबतचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. गोपीचंद पडळकर यांच्या या वक्तव्यावर आता सत्ताधारी जबाबदार मंत्र्यांकडून काय प्रतिक्रिया दिली जाते? ते पाहणं महत्वाचं आहे.माणसं पाठवली. कशासाठी? गोपीचंद पडळकरने कुठल्या व्यापाऱ्याकडून पैसे घेतले का? घ्या एखादा मधला व्यापारी घ्या आणि त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करा. अरे जयंत पाटला तुझ्या सारखा भिकारी अवलाद गोपीचंद पडळकरची नाही. माझ्यात कार्यक्रम करायची ती धमक आहे. तुझ्यासारखी ती अवलाद नाही. एवढ्या खालच्या लेव्हलला? आता माझा दांडीयाचा कार्यक्रम आहे. ये बघायला. तुझे डोळे दिपून जातील कार्यक्रम बघूनङ्ङ्ग, अशा शब्दांत गोपीचंद पडळकर यांनी निशाणा साधला. दरम्यान, गोपीचंद पडळकर यांनी जयंत पाटील यांच्या वडिलांचा उल्लेख करत अतिशय खालच्या शब्दांत

देखील टीका केली. त्यांनी वापरलेले शब्द आक्षेपार्ह असे आहेत.गोपीचंद पडळकर यांच्या टीकेवक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ङ्गङ्गही कुठली भाषा आहे? नेहमी संस्कार आणि सुसंस्कृतपणाचं नाव घेणाऱ्या भाजपच्या नेतृत्वाने यावर भाष्य करावं. महाराष्ट्राचं राजकारण आपण कुठल्या पातळीवर घेऊन चाललो आहोत? ही कुठली भाषणा आहे? असं कुणी बोलल्याचं माझ्या तरी निदर्शनास आलेलं नाही. याला कुठेतरी लगाम लागला पाहिजेङ्गङ्ग, अशी भूमिका जितेंद्र आव्हाड यांनी मांडली.पितृत्वाबद्दल शंका व्यक्त करायची. हे कुठले संस्कार आहेत?ङ्गङ्ग, असाही सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केली. तसेच नेतृत्वाची भीती असायला हवी, असं आव्हाड म्हणाले. तसेच महाराष्ट्राची संस्कृती फार लयाला जात आहे, असं रोखठोक मत त्यांनी मांडलं.

क्रेडिट कार्ड अन् इतर कर्जांच्या वसुलीसाठी बनावट ओळख

नाशिक : नाशिक जिल्ह्याच्या इगतपुरी येथे पोलिसांच्या एका विशेष पथकाने एका अवैध कॉल सेंटरवर छापा टाकून मोठी कारवाई केली आहे. या कॉल सेंटरमधून क्रेडिट कार्ड आणि इतर कर्जांच्या वसुलीसाठी बनावट ओळख वापरून लोकांना धमकावलं जात होतं. या कारवाईत पोलिसांनी जवळपास २४ लाख ३२ हजार रुपयांचे साहित्य जप्त केले असून, दोघांना अटक केली आहे. नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील आणि अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक सारिका अहिरराव यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, १५ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी इगतपुरी येथील मीनाताई ठाकरे संकुलात हे कॉल सेंटर चालत असल्याचं उघड झालं. तपासणी केली असता, हे कॉल सेंटर कर्जवसुलीसाठी कायदेशीर प्रक्रिया न वापरता, बनावट ओळख धारण करून धमकावण्याचे कॉल करत असल्याचं निष्पन्न झालं. यात कर्ज खातेदार तसेच त्यांच्या नातेवाईकांनाही लक्ष्य केलं जात होतं.याप्रकरणी पोलिसांनी नरेंद्र शशिकांत भोंडवे (वय ३२) आणि पारस संजय भिसे (वय २६) या दोन मुख्य सूत्रधारांना अटक केली आहे. त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईल फोन आणि सिमकार्ड असा मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या कॉल सेंटरमध्ये ४० ते ५० कर्मचारी काम करत असल्याचं आढळून आलं असून, ते बेकायदेशीरपणे कर्जदारांचा वैयक्तिक डेटा गोळा करत होते. या कॉल सेंटरकडे कोणताही वैध परवाना नव्हता.सदर कॉल सेंटर आर.बी.एल, एच.डी.बी फायनान्स आणि ग्रो फायनान्स यांसारख्या कंपन्यांसाठी कर्ज वसुलीचं काम करत असल्याचं समोर आलं आहे. पुढील तपास सायबर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक नागेश मोहिते करत आहेत. ही संयुक्त कारवाई पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली,

राहुल गांधींच्या आरोपांवर अजित पवारांचा जोरदार प्रहार; म्हणाले, हरले की आठवतं...

नागपूर : राहुल गांधी यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगावर निशाणा साधला असून अनेक ठिकाणी मतचोरी झाल्याचा आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. राहुल गांधींच्या आरोपात काहीही तथ्य नसल्याचे पवारांनी स्पष्ट केले. अजित पवार म्हणाले, जेव्हा ते निवडणुका जिंकतात तेव्हा त्यांना ईव्हीएम किंवा मतदार याद्यांचा काही प्रश्न वाटत नाही. पण जसेच ते पराभूत होतात, लगेचच ईव्हीएम हॅकिंग, मतचोरी असे आरोप सुरू होतात. हा विरोधाभास लोकांसमोर स्पष्ट दिसतो. ते पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला राज्यात मोठ्या प्रमाणावर यश मिळाले, मात्र राष्ट्रवादी काँग्रेसला अपेक्षेपेक्षा काँग्रेस

कमी जागा मिळाल्या. तेव्हा आम्ही कधीही मतचोरी किंवा ईव्हीएम हॅकिंगसारखा आरोप केला नाही. आम्ही पराभव स्वीकारून कामाला लागलो. पण काँग्रेस, आम आदमी पार्टी किंवा ममता बॅनर्जी यांच्या बाबतीतही पाहिलं, तर जिंकले की सर्व ठीक आणि हरले की मशीनवर प्रश्नचिन्ह असे टोला अजित पवार यांनी लगावला, कर्नाटकमध्ये जिंकली, तेलंगणात विजय मिळवला, हिमाचलमध्येही सरकार स्थापन झाले, तेव्हा कुठेही ईव्हीएमवर शंका घेतली गेली नाही. ममता बॅनर्जी तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्या, आम आदमी पार्टीने दिल्ली आणि पंजाब जिंकले, तेव्हा काही वाद नाही. मग पराभव झाल्यावरच का शंका येते, हा प्रश्न मला पडतो, असे पवार म्हणाले.यावेळी त्यांनी विरोधकांनी पसरवलेल्या फेक नेरेटिव्हवरही टीका केली. लोकसभा निवडणुकीदरम्यान आम्ही राज्यघटना बदलायला निघालो आहोत, असा खोटा प्रचार केला गेला. त्यामुळे आम्हाला मोठा फटका बसला. मात्र विधानसभेत आम्ही वेळेवर मार्ग काढला आणि लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांसाठी वीज बिल माफी यांसारख्या उपयुक्त योजना राबवून परत चांगले यश मिळवले, असे ते म्हणाले.आगामी महानगरपालिका निवडणुकांबाबत अजित पवार यांनी सांगितले की, त्या महायुतीसोबत लढायच्या की स्वतंत्र, याचा निर्णय स्थानिक पातळीवरील परिस्थिती पाहून घेतला जाईल. कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र या सर्व भागांची राजकीय समीकरणे वेगवेगळी आहेत. स्थानिक नेतृत्वाच्या सूचनांनुसारच पुढचा निर्णय होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.विदर्भातील राजकीय समीकरणावर बोलताना पवार म्हणाले, विदर्भ कुणाचाच कायम बालेकिल्ला राहू शकत नाही. वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या पक्षांना इथून यश मिळालं आहे. आज भाजप मोठा पक्ष आहे, नागपूरचे प्रतिनिधित्व देवेंद्र फडणवीस आणि नितीन गडकरी करत आहेत. मात्र आमच्याही कार्यकर्त्यांना महानगरपालिकेत संधी मिळाली पाहिजे, ही आमची भूमिका आहे. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिल्याचे नमूद करून पवार म्हणाले की, जवळपास सात वर्षांनंतर या निवडणुका होत आहेत. यावेळी नव्या लोकप्रतिनिधींना संधी मिळेल. आमच्या पक्षाने यासाठी तयारीचा वेग घेतला आहे. नागपुरात चिंतन शिबिरात यावर सविस्तर चर्चा होणार आहे, असेही अजित पवार यांनी सांगितले.

ओबीसींचे मसीहा, छगन भुजबळांची मुख्यमंत्र्यांवर स्तुतिसुमने; तर शरद पवारांवर गंभीर आरोप, म्हणाले...

नागपूर: अंतरवाली सराटीत पोलिसांवर झालेल्या हल्ल्याच्या कटात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा आमदार सहभागी होता,फ असा खळबळजनक दावा राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी केला. त्याच वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर स्तुतिसुमने उधळताना ङ्गते ओबीसींचे मसिहा आहेत, आशेचा किरण आहेत,फ अशा शब्दांत कौतुक केले.सरकारच्या अध्यादेशामुळे ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धोका निर्माण झाल्यानंतर सरकारने काढलेला अध्यादेश एकतर मागे घ्यावा किंवा त्यात आम्ही सुचविल्याप्रमाणे बदल करावे,फ अशी मागणी सरकारकडे करण्यात आली आहे. ङ्गया संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली आहे. संपूर्ण मंत्रिमंडळात फडणवीस हेच ओबीसींसाठी आशेचा किरण आहेत. ते नेहमी म्हणत असतात भाजपचा डीएनए हा ओबीसी आहे. खरेच जर त्यांच्या पक्षाचा डीएनए ओबीसी आहे, तर ओबीसी समाजासाठी घातक असलेला हा अध्यादेश मागे घ्यावा; तसेच ओबीसी समाजाचे मागासलेपण दूर करण्यासाठी निधीची उपलब्धता करून द्यावी. हे केले, तर फडणवीस ओबीसी समाजाचे मसिहा ठरतील,फ अशी ग्वाही त्यांनी दिली.या वेळी भुजबळांनी ङ्गसरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी काढलेला अध्यादेश अत्यंत घातक असून, हा मागे घेण्यासाठी किंवा त्यात आवश्यक बदल करण्यासाठी ओबीसींनी एकजूट होऊन लढा द्यावा,फ असे आवाहन त्यांनी केले.

शरद पवार यांच्यावर टीका करताना भुजबळ म्हणाले, ङ्गपवार यांच्या रणनीतीमुळेच जरांगेंचा उदय झाला. दोन वर्षांपूर्वी अंतरवाली सराटीत पोलिसांवर दगडफेक पूर्वनियोजित होती. याचा कट पवारांच्या राष्ट्रवादीच्या आमदाराने रचल्याचा आरोपही त्यांनी केला. दोन वर्षांपूर्वी त्यांनी केलेल्या आंदोलनाला बरेच दिवस झाले म्हणून सरकारने त्यांना आणि ज्या महिला उपोषणाला बसल्या त्यांना रुग्णालयात दाखल करण्यासाठी पोलिसांना पाठवले. परंतु, जरांगे यांनी आपण उद्या सकाळी या, असे पोलिसांना सांगितले. त्यानंतर रात्री बैठक झाली. त्याला पवारांचे आमदार होते. या बैठकीनंतर रात्री अनेकांच्या घरातील गच्चीवर दगड गोळा करण्यात आले.

आणि सकाळी जेव्हा पोलिस आले तेव्हा त्यांच्यावर तुफान दगडांचा मारा करण्यात आला. पोलिस पळत होते, घरात आश्रय घ्यायला गेले त्यांना घरातून लाथा घालून बाहेर काढले गेले. यात महिला पोलिसांसह ८४ पोलिस जखमी झाले. त्यानंतर पोलिसांनी लाठीहल्ला केला. त्यात अनेक आंदोलक जखमी झाले. हे घडवण्यापूर्वी शरद पवार साहेबांनी विचार करायला हवे होते, असेही भुजबळ म्हणाले.मराठा समाजाला देण्यात येणाऱ्या आरक्षणाबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या काळात समिती बनवण्यात आली होती. या समितीत सर्व मराठा नेते होते, आता ओबीसींसाठी समिती बनवण्यात आली आहे, तर पवार त्यावर टीका करतात. आमच्या आरक्षणाला धक्का लागणार असेल तर आम्ही लढायचे सुद्धा नाही का ? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला

तीन मित्र अन् ९९ रुपयांच्या व्यवसायाची कल्पना, स्टार्टअपची केली सुरुवात, आज ८ कोटींचा टर्नओव्हर...

अतुल्य कौशिक यांनी त्यांचे मित्र मनीष अग्रवाल आणि आशय मिश्रा यांच्यासोबत मिळून प्रेपइंस्टा नावाचा एक एडटेक स्टार्टअप सुरू केला, ज्याने केवळ ९९ रुपयांपासून सुरुवात करून आज करोडोंचा टर्नओव्हर गाठला आहे. इंजिनियरिंग आणि नॉन-इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांना आयटी कंपन्यांमध्ये प्लेसमेंटसाठी तयार करणे हे या स्टार्टअपचे उद्दिष्ट आहे. कंपनी २०० हून अधिक कोर्से स पुरवते आणि विद्यार्थ्यांना मोफत ट्रायल देते.९९ रुपयांचे उत्पादन अतुल्य कौशिक हे मूळचे मेरठचे आहेत. त्यांनी मेरठमधील दयावती मोदी अकादमीमधून १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर, त्यांनी व्हीआयटी, वेल्लोरमधून कॉम्प्युटर सायन्समध्ये बीटेकची पदवी मिळवली. अतुल्य कौशिक यांनी त्यांच्या करिअरची सुरुवात गूगल पे सारख्या मोठ्या कंपनीत टेक्निकल हेड म्हणून केली. पुढे, त्यांनी बंगळूरस्थित फिनटेक स्टार्टअप इंस्टामोजोमध्ये काम केले. याच

ठिकाणी त्यांना विद्यार्थ्यांमध्ये नोकरी साठी योग्य माहिती आणि तयारीची कमतरता जाणवली. ही गरज ओळखून त्यांनी माइगीकमोंकी. कॉम नावाचा एक साइड बिजनेस सुरू केला. या वेबसाइटवर ते नोकरीसंबंधी टिप्सची पीडीएफ ९९ रुपयांना विकायचे. पहिल्याच दिवशी त्यांना २९९ रुपयांची कमाई झाली. ९ महिन्यांत ही कमाई ४५ लाख रुपयांपर्यंत पोहोचली. याच यशामुळे त्यांना नोकरी सोडून पूर्णवेळ स्टार्टअप सुरू करण्याची प्रेरणा मिळाली. व्यवसाय अन् आव्हान आपल्या साइड बिजनेसच्या यशानंतर अतुल्यने त्याचे दोन जुने मित्र मनीष अग्रवाल आणि आशय मिश्रा यांना सोबत घेतले. तिघांनी मिळून माइगीकमोंकी.कॉम चे नाव बदलून प्रेपइंस्ट असे केले. यासाठी त्यांनी फक्त ९९ रुपयांमध्ये नवीन डोमेन खरेदी केले. एप्रिल २०१९ मध्ये त्यांनी नोएडा येथे एका छोट्या जागेतून कंपनीची सुरुवात केली. सुरुवातीच्या दिवसांमध्ये त्यांच्यासमोर सर्वात मोठे आव्हान होते, ते म्हणजे योग्य कर्मचाऱ्यांची भरती करणे. मर्यादित संसाधनांमुळे ते जास्त पगार देऊ शकत नव्हते. तरीही, काही मेहनती लोक त्यांच्यासोबत जोडले गेले. याव्यतिरिक्त, सोल प्रोप्रायटरशिप असल्यामुळे त्यांना बँकेतील सततच्या वाढत्या व्यवहारांसाठी जाब द्यावा लागत होता.विद्यार्थ्यांना नोकरी अतुल्य कौशिक आणि त्यांच्या मित्रांनी कंपनीचे बिजनेस मॉडेल वेगळे ठेवले. त्यांनी केवळ नोकरी शोधणाऱ्यांपर्यंतच मर्यादित ठेवले नाही. त्यांनी आपला व्यवसाय तीन वेगवेगळ्या प्रकारे वाढवला. प्रथम, ते विद्यार्थ्यांना १-२ महिन्यांसाठी मोफत ट्रायल देतात. त्यानंतर त्यांना ङ्गप्रेपइंस्टा प्राइमम पॅकेज खरेदी करण्यास प्रोत्साहित करतात. या पॅकेजमध्ये २०० हून अधिक कोर्से स समाविष्ट आहेत. दुसरे म्हणजे, ते कंपन्यांना थेट प्लेसमेंटसाठी तयार असलेले विद्यार्थी उपलब्ध करून देतात. बदल्यात विद्यार्थ्यांच्या वार्षिक पॅकेजच्या ५-१० % हिस्सा घेतात. तिसरे म्हणजे, ते कॉलेजांसोबत भागीदारी करतात, ज्यामुळे कॉलेजच्या विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात सब्सक्रिप्शन मिळू शकेल आणि त्यांचे प्लेसमेंट रेट सुधारण्यास मदत होईल.

टीसीएस, ॲमेझॉनसारख्या कंपन्यात नोकऱ्या या उपक्रमाचा व्यवसाय झपाट्याने वाढला आहे. सुरुवात झाल्यापासून ५ वर्षांच्या आत कंपनीचा टर्नओव्हर ८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. दर महिन्याला २० लाखांपेक्षा जास्त लोक त्यांच्या वेबसाइटला भेट देतात. ७.५ कोटींपेक्षा अधिक लोकांनी त्यांच्या मोफत कंटेंटचा लाभ घेतला आहे. आतापर्यंत ३ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी त्यांचे सब्सक्रिप्शन घेतले आहे. यापैकी अनेकांना टीसीएस, ॲमेझॉन आणि डेलॉइड यांसारख्या टॉप कंपन्यांमध्ये नोकरी मिळाली आहे. सर्वात मोठे पॅकेज १.०३ कोटी रुपयांचे राहिले आहे. अतुल्य कौशिक यांचे मत आहे की, शिक्षण क्षेत्रात त्यांच्या कुटुंबाच्या पार्श्वभूमीने त्यांना या मार्गावर चालण्याची प्रेरणा दिली.

उत्तराखंडमध्ये भूस्खलन; एकाचा मृत्यू, ११ बेपत्ता, चमोली जिल्ह्यात चार गावांमधील ३० घरे जमीनदोस्त

उत्तराखंड: उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे चार गावांमध्ये झालेले भूस्खलन आणि पुरामध्ये गुरुवारी ३० घरे जमीनदोस्त झाली. या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला, तर २० जण जखमी झाले आहेत. याशिवाय ११ जण बेपत्ता असल्याचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी सांगितले. मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी देहरादूनमधील ङ्गराज्य आपत्कालीन ऑपरेशन सेंटरफ (एसईओसी) येथे जाऊन नंदनगरमधील परिस्थितीचा आढावा घेतला. ङ्गचमोली जिल्ह्यातील नंदनगर क्षेत्रातील कुंतारी लगाफली, कुंतारी लगासरपाणी, सेरा आणि धुर्मा या चार गावांमध्ये मोठ्या भूस्खलनामुळे ३३ घरे जमीनदोस्त झाली आहेत. तसेच, अनेक दुकाने आणि गोशाळांचे नुकसान झाले आहे.काही जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर गंभीर जखमींना ऋषिकेश येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) येथे नेण्यात येत आहे. यामध्ये डोक्याला दुखापत झालेल्या एका मुलाचाही समावेश आहे. बाधित भागातील काही लोक अजूनही त्यांच्या घरात अडकले आहेत आणि त्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असेही धामी यांनी सांगितले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ), इंडो-तिबेटीयन सीमा पोलिस (आयटीबीपी) आणि पोलिसांसह विविध यंत्रणा घटनास्थळी पोहोचल्या आहेत. चमोली जिल्हा दंडाधिकारी, पोलिस अधीक्षक आणि इतर वरिष्ठ अधिकारीही सकाळीच घटनास्थळी रवाना झालेफ, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.नंदनगरला जोडणारे रस्ते अनेक ठिकाणी बंद झाले आहेत आणि त्यांची दुरुस्ती करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. कुंत्री गावातील रहिवासी आणि भारतीय रेडक्रॉसच्या जिल्हा शाखेचे उपाध्यक्ष नंदन सिंह हे त्यांच्या पथकासह मदत आणि बचावकार्यात सहभागी

झाले आहेत. त्यांनी सांगितले, ङ्गदलदल आणि जड ढिगाऱ्यांमुळे मदतकार्य कठीण बनले आहे. मुसळधार पावसात, कुंत्री गावाच्या वरच्या टेकडीवरून तीन ठिकाणी मोठ्या प्रमाणात चिखल आणि दगड खाली वाहत आल्याने सर्व काही उद्ध्वस्त झाले. त्याच टेकडीच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या मोख खोऱ्यातही मुसळधार पावसामुळे मोख नदीला पूर आला आणि धुर्मा गावापासून सेरा गावापर्यंत अनेक इमारतींचे नुकसान झाले. अनेक लोक कसेबसे स्वत:चा जीव वाचवण्यात यशस्वी झाले, परंतु काही ढिगाऱ्याखाली गाडले गेले.

जिल्हा नियोजन समितीची बैठक २५ सप्टेंबर रोजी

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद जाधव (पाटील) यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि. २५ सप्टेंबर रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक होणार आहे. ही बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये दि. १६ मे २०२५ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीच्या इतिवृत्तावरील अनुपालन वाचून अंतिम अहवाल करणे व सन २०२५-२६ जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी घटक कार्यक्रमाच्या अनुषंगाने दि. १७ सप्टेंबर अखेरचा मासिक प्रगती अहवालाचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच आयत्यावेळी येणाऱ्या विषयाबाबत कार्यवाही केली जाणार आहे. या बैठकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुखांनी आवश्यक माहितीसह स्वत: उपस्थित राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी पत्रकाद्वारे दिले आहेत.



युवकांनी विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग क्विझमध्ये सहभागी व्हावे-जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर यांचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयाच्यावतीने देशभरातील युवकांना विशेष उपक्रमात सहभागी करुन घेण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग क्विझ आयोजित करण्यात आला असून या क्विझमध्ये जिल्ह्यातील युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या क्विझमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक युवक-युवतीला माय भारत पोर्टल तर्फे प्रमाणपत्र देण्यात येणार असून सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्या स्पर्धेकांचा विशेष गौरव केला जाणार आहे. युवकांनी ज्ञानाची चाचणी घेण्यासाठी, स्वत:ला सिध्द करण्यासाठी तसेच प्रमाणपत्र मिळविण्यासाठी या क्विझमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे. क्विझमध्ये सहभागी होण्यासाठी युवकांनी वर नोंदणी करुन क्विझ सोडवावा. बुलढाणा जिल्हा हा राज्यात सर्वाधिक सहभाग नोंदविणारा ठरावा या हेतूने जिल्ह्यातील युवक मंडळे, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था तसेच युवकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन बुलढाण्याचे जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर यांनी केले आहे.

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय धिनस्त सात गाळे भाडे तत्वावर देण्यात येणार

माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीरपत्नी यांना संधी अर्ज करण्यासाठी २२ सप्टेंबरपर्यंतची मुदत

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या अधिनस्त मेन रोडवर स्थित असलेले (१०२०) सात गाळे १२ हजार रुपये प्रती गाळ्याप्रमाणे प्रतिमाह विद्युत बीला व्यतिरिक्त भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक जिल्ह्यातील माजी सैनिक, माजी सैनिक विधवा तसेच वीरपत्नी यांनी आपले अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा यांच्याकडे २२ सप्टेंबर २०२५ पर्यंत जमा करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी माजी सैनिक, माजी सैनिक विधवा यांची नोंदणीकृत बँक पतसंस्था, माजी सैनिक महिला बचत गट, माजी सैनिक, विधवा (वैयक्तिक व्यवसाय), इतर नागरिक कार्यालयाचे गाळे भाडे तत्वावर देण्यासाठी असा प्राधान्यक्रम ठरवून दिलेला आहे. गाळ्यांची जमा करण्यात येणारी सुरक्षा अनामत रक्कम एका वर्षाचे भाडे राहील. करारनामा जिल्हा निबंधक कार्यालय यांच्याकडे नोंदणी करुन भाडे करारनाम्याचा कालावधी दोन वर्ष राहील. भाडेकरु यांनी सादर केलेले अर्ज सैनिक कल्याण अधिकारी यांच्याकडून मंजूर झाल्यानंतर करारनामा अटी व शर्तीनुसार करण्यात येईल व बाध्य राहील. मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

नदी पात्रातून अवैध वाळू उपसा व वाहतूक थांबवा...!

चंद्रकांत खरात यांची राज्याचे महसूलमंत्री मंत्र्यांकडे मागणी

जनसंचलन/ देऊळगाव राजा

पर्यावरणाचा समतोल धोक्यात शेतीचे नुकसान पोलिस व प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश जनजागृती आणि दंडात्मक कारवाईची जोरदार मागणी देऊळगाव राजा बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा आणि महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये नदी पात्रातून होत असलेला अवैध वाळू उपसा व वाहतूक ही गंभीर समस्या बनली आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडत असून शेतकऱ्यांच्या शेतीला मोठा धोका निर्माण होत असल्याने महाराष्ट्र शासन युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त चंद्रकांत खरात यांनी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या निवेदन पाठवून तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.सदर पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, अवैध वाळू उपशामुळे नद्यांचे पात्र बदलून पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे, जलस्रोत नष्ट होत आहेत आणि शेतीला अपार नुकसान पोहोचत आहे. यामुळे गावांमध्ये अराजक निर्माण होत असून गुन्हेगारीचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शासन आणि प्रशासनावर ठोस मागण्या लोक आयुक्तांच्या निर्देशांनुसार राज्य शासनाने नदीपात्रातून वाळू उपसा करण्यास कठोर बंदी घालावी. अवैध वाळू वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व संबंधित महसूल , पोलिस, परिवहन जलसंपदा विभागांनी समन्वयाने कार्य करावे.पोलिस विभागाने पेट्रोलिंग वाढवून सतर्क राहावे व अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. परिवहन विभागाने नंबर नसलेल्या वाहनांवर नियंत्रण ठेवून त्यांना मुळ मालकाकडे परत पाठवावे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडून शासनाच्या निर्देशांचे पालन करावे. जनजागृती मोहिमा राबवून अवैध वाळू उपशापासून लोकांना दूर ठेवण्याची भूमिका स्वीकारावी.

पर्यावरण आणि शेतीवरील गंभीर परिणाम अवैध वाळू उपशामुळे:

नदी पात्र बदलून शेतीचे नुकसान जलस्रोतांचे नाश

पर्यावरणाचा समतोल बिघडणे गावांमध्ये अराजक आणि गुन्हेगारी वाढणे चंद्रकांत खरात यांनी यावर उपाय म्हणून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी शासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. सहकार्य आणि जनजागृतीचे आवाहन चंद्रकांत खरात यांनी नागरिकांनाही सजग राहण्याचे आवाहन करत पुढे म्हटले आहे: ङ्गङ्घपर्यावरण आणि शेती वाचवण्यासाठी प्रशासनास सहकार्य करा. अवैध वाळू उपशास मदत न करता त्याविरोधात आवाज उठा. नद्यांचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.फ्फ ते महाराष्ट्र शासन सामाजिक युवा पुरस्कार प्राप्त असून जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य आहेत.

प्रशासनासाठी निर्देश

अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची यादी तयार करून सार्वजनिक करावी.

. दंडात्मक कारवाई करून चुकीचे वर्तन थांबवावे.

. महसुलाची हानी टाळण्यासाठी दक्षतेने काम करावे.

पर्यावरणीय नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करावी.

.लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांसह सहकार्य वाढवावे.

पर्यावरणाचे रक्षण आणि शेती वाचवण्यासाठी तातडीने कारवाई करणे अत्यावश्यक आहे. शासन, प्रशासन आणि समाज या सर्वांनी एकत्र येऊन नदी पात्रातील अवैध वाळू उपशावर अंकुश ठेवला नाही तर भविष्यात मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल, असे चंद्रकांत खरात यांनी स्पष्टकेलेआहे.

अण्णाभाऊ साठे सोशल फोरमचा शासनाला इशारा उपवर्गीकरण आरक्षण मिळालेच पाहिजे..!

जनसंचलन/बुलढाणा

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सोशल फोरम बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज गुरुवार १८ सप्टेंबर रोजी भव्य निषेध आंदोलन करण्यात आले. शासनाने न्यायमूर्ती अनंत बदर समितीला सहा महिन्यांची मुदतवाढ दिल्याबद्दल आंदोलकांनी संताप व्यक्त करून ही मुदतवाढ तात्काळ रद्द करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. यावेळी आंदोलनादरम्यान मातंग समाजाला अ, ब, क, ड उपवर्गीकरण आरक्षण मिळालेच पाहिजे, आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचं ! उठ मातंगा जागा हो, संघर्षाचा धागा हो! अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेला. या आंदोलनाचे नेतृत्व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सोशल फोरमचे संस्थापक अध्यक्ष माननीय श्री विजयजी अंभोरे यांनी केले. यावेळी मुख्य सचिव बी.के. खरात सर, एस.एल. डोंगरे साहेब, निवृत्ती तांबे, जिल्हाध्यक्ष श्रीकृष्ण शिंदे, दिगंबर पाटोळे, विजय पारेकर, दादाराव महाले, विश्वनाथ महाले, गजानन गायकवाड, रामा जाधव, नभाताई इंचेकर, प्रभाकर धोंगडे, लिंबाजी साळवे, संतोष गायकवाड, प्रदीप साळवे, नंदू आढाव, भास्कर आघाम, संगीताताई निकाळजे,

अंजनाताई खुपराव, मंगलाताई निकाळजे, सरला अंभोरे, संभाजी निकाळजे, रामधन सुरोशे, विलास सुरोशे, गजानन निकाळजे, गणेश क्षीरसागर, ओमप्रकाश नाटेकर, फकीरा निकाळजे, कैलास मोरे, सचिन काकफळे, कृष्णा शेलार, रंजना निकाळजे, सुभाष सुरडकर, विकी आव्हाड, लहू कांबळे, सूर्यकांत जाधव, अजय जाधव, कार्तिक जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आंदोलकांनी शासनाला इशारा दिला की, मातंग समाजाच्या आरक्षणाबाबत टाळाटाळ सहन केली जाणार नाही. तातडीने अ ब क ड उपवर्गीकरण आरक्षणाची अंमलबजावणी झालीच पाहिजे.

जिल्हास्तर शालेय बॉक्सिंग क्रिडा स्पर्धा संपन्न

जनसंचलन/बुलडाणा

बुलडाणा जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा यांच्या वतीने दि. १५ व दि.१६ सप्टेंबर, २०२५ ला जिल्हास्तर शालेय बॉक्सिग क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धा जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय बुलडाणाच्या बॉक्सिग हॉलमध्ये आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धमध्ये संपुर्ण बुलडाणा जिल्हयामधुन विविध शाळेचे १६० मुले व मुली यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेसाठी बुलडाणा जिल्हा बॉक्सिग असोसिएशन बुलडाणा यांच्या वतीने असोशिएशनचे अध्यक्ष श्री. विठ्ठलराव लोखंडकार यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष श्री. निलेश इंगळे, कोषाध्यक्ष प्रा.डॉ. संतोष आंबेकर सर सचिव श्री. राज सोळंकी व जिल्हा संघटनेचे जिल्हा प्रशिक्षक श्री. संकेत धामंदे सर यांनी सर्व पंच उपस्थित ठेवुन स्पर्धा संपन्न केल्या. जिल्हा क्रिडा अधिकारी श्री.बी.ए. महानकर साहेब यांनी स्पर्धेचे उद्घाटन करुन खेळाडुंना मार्गदर्शन केले. आंनदी वातावरणात स्पर्धा पार पडल्या बक्षिस वितरण श्री. महानकार साहेब क्रिडा अधिकारी श्री. रविंद्र धारपवार साहेब, मनोज श्रीवास, प्रा.डॉ. श्री. संतोष आंबेकर सर, श्री.निलेश इंगळे, श्री.राज सोळंकी, श्री. संकेत घामंदे यांचे हस्ते पार पडले.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

गुंतवणूक रक्कम		५००	१०००	१५००	२०००	३०००	५०००
अ.क्र.	गुंतवणूक कालावधी महिने	पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम					
१	१५६	१०३४१८	२०६८३६	३१०२५४	४१३६७२	६२०५०७	१०३४१७९
२	१४४	९५५४४	१९१०८८	२८६६३३	३८२१७७	५७३२६५	९५५४४२
३	१३२	८८२६९	१७६५३८	२६४८०६	३५३०७५	५२९६१३	८८२६८८
४	१२०	८१५४४	१६३०८७	२४४६३१	३२६१७५	४८९२६२	८१५४३६
५	१०८	७५३३६	१५०६७१	२२६००७	३०१३४२	४५२०१३	७५३३५५
६	९६	६५५९६	१३९१९३	२०८७८९	२७८३८६	४१७५७९	६९५९६५

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

अ.क्र.	मुदती ठेवीचे विवरण		लागू व्याजदर	पतसंस्था व इतर संस्था
१	१५ दिवस ते ९० दिवस		६.००%	६.००%
२	९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता)		६.५०%	५.००%
३	१८१ दिवस ते १३ महिने		६.००%	६.००%
४	१४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
५	आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
६	मासिक ठेव		७.००%	–
७	बचत ठेव	अ) रू. ३ लाखांपर्यंत	३.००%	–
		ब) रू. ३ लाखांचे वर	४.५०%	–

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

वय	गुंतवणूक रक्कम	मिळणारी रक्कम
जन्माच्या वेळी	१७०००	१०३६०९
१ वर्ष	१८०००	१००६५७
२ वर्ष	१९५००	१०००५२
३ वर्ष	२१५००	१०१२१७
४ वर्ष	२३५००	१०१५०९
५ वर्ष	२५५००	१०१०६४
६ वर्ष	२७५००	१०००७३
७ वर्ष	३००००	१०००९७
८ वर्ष	३३०००	१०१०२७
९ वर्ष	३६०००	१०११२२
१० वर्ष	३९०००	१००५१५

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

आक्रोश मोर्चा ६ आक्टोबरला मूळ आदिवासी समाजाची आरक्षण बचावसाठी बैठक संपन्न.....

जनसंचलन/ बुलडाणा

महाराष्ट्रात मागिल अनेक वर्षापासून आदिवासी समाजामध्ये गैर आदिवासी समाजाचे आरक्षण मिळावं म्हणून आंदोलन, मोर्चे चालू आसून मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करून आरक्षण देण्याची मागणी हैदराबाद गॅझेटनुसार केली आहे, त्याच अनुषंगाने हैदराबाद गॅजेटचा आधार घेऊन बंजारा व इतर समाजाने सुद्धा आदिवासी समाजात समाविष्ट करून आरक्षण देण्याची मागणी करण्यासाठी जोर धरला आहे दरम्यान या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील सकल आदिवासी समाजाची विश्राम भवन बुलढाणा येथे १७ सप्टेंबर रोजी बैठक संपन्न झाली, यावेळी मूळ आदिवासी समाजाचा आरक्षण बचाव आक्रोश मोर्चाचे आयोजन दिनांक ६ अक्टोबर २५ रोजी सर्वनुमते ठरले आहे, यावेळी एक तिर एक कमान सर्व आदिवासी एक समानचा नारा देत ६ ऑक्टोबर रोजी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर सकाळी ११:३० वाजता एकलव्य महाराज चौक गांधी भवन जवळ या ठिकाणावरून आयोजन करण्याचे ठरले आहे करण्यात चे ठरले आहे. त्याचं बरोबर १२५०० अतिरिक्त झालेल्या ठिकाणी आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांची नोकर भरती करावी यासह अनेक मागण्यासाठी करण्यात मोर्चा काढण्याचे ठरले आहे.यावेळी बुलढाणा जिल्ह्यातील सकल आदिवासी समाजाचे सामाजिक कारकर्ते विविध आदिवासी संघटनेचे पदअधिकारी तसेच आजी माजी जि. प. प.स. सदस्य या बैठकीस मोठ्या संख्येने हजर होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८